VOL- X ISSUE- IV APRIL 2023 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.367 ISSN 2349-638x

# प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर कोरोनानंतर झालेल्या परिणामाचा अभ्यास

डॉ.ज्ञानेश्वर दगडू पवार
सहा. प्राध्यापक
श्रीकृष्ण बी.एड कॉलेज, उस्मानाबाद.

सारांश:

*शिक्षणाला मानवी जीवनामध्ये अत्यंत महत्वाचे स्थान आहे. बदलत्या काळानुसार तर शिक्षण हे मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. शिक्षणामुळे प्रत्येक व्यक्तीचा, समाजाचा, अखिल मानव जातीचा राष्ट्रांचा सर्वांगिण विकास साधता येतो. परंतु दोन वर्षापूर्वी कोरोना चा पादुर्भाव संपूर्ण जगावर झाला होता. या महामारीने संपूर्ण जगाला विळखा मारला होता. या काळामध्ये सर्व शैक्षणिक वेळापत्रक, अध्ययन व अध्यापन तसेच विविध स्पर्धा यावर परिणाम झाला होता.*

*कोरोना महामारीमुळे जो शैक्षणिक परिणाम झाला आहे तो विविध संशोधनाच्या माध्यमांतून मांडणे गरजेचे आहे. या महामारीचा शैक्षणिक परिणाम ग्रामीण भागामध्ये जास्त प्रमाणात झाला होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे मोबाईल, टॅब, इंटरनेट यासारखी साधने उपल्बध नव्हती यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर कोरोनानंतर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे.*

प्रस्तावना :

प्राथमिक स्तर हा शिक्षणातील महत्वाचा बिंदू आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतो. प्राथमिक शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढ होणे गरजेचे आहे. या शैक्षणिक प्रगतीच्या टप्यांवर पालक, समाज, सरकार, विविध सामाजिक संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी खूप प्रयत्न करतात. जगामध्ये विविध नैसर्गिक आपत्तींचा अनुभव मानवाने घेतला आहे. परंतु कोरोना सारख्या महाभयंकर साथीचा परिणाम संपूर्ण जगाने अनुभवला आहे.

२१ व्या शतकाला संगणकाचे युग असे म्हटले जाते आता विविध क्षेत्रामध्ये संगणकाचा वापर मोठया प्रमाणात होताना दिसत आहे. कोरोना काळामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी ई लर्निंग सोबत ऑनलाईन शिक्षण या शिक्षणातल्या नवीन शिक्षण पध्दतीचा परिचय झाला. ऑनलाईन शिक्षण पध्दती ही, त्याठिकाणीच ऑनलाईन शिक्षणपध्दती यशस्वी झाली असे म्हणता येईल. परंतु ग्रामीण भागात ज्याठिकाणी इंटरनेटच्या सुविधा उपलब्ध नाहीत किंवा ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल, संगणक, लॅपटॉप, एलसीडी प्राजेक्टर व टॅब ही साधने उपल्बध नाहीत अशा ठिकाणी कोरोनाकाळात शिक्षण पोहचले नाही. कोरोना काळात प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यापर्यंत शिक्षण न पोहचल्यामुळे त्यांच्या संकल्पना व संबंधित विषयाचे आशय ज्ञान परिपूर्ण प्राप्त करता आले नाही. म्हणून संशोधकाने प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर कोरोनानंतर झालेल्या परिणामाचा अभ्यास केला आहे.

## समस्या विधान :

उस्मानाबाद जिल्हयातील प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर कोरोनानंतर झालेल्या परिणामाचा अभ्यास.

संशोधनाची उद्दिष्टे :

१.प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कोरोनानंतर अध्ययनातील समस्यांचा अभ्यास करणे.
२.प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कोरोनानंतर शिक्षणावर झालेला परिणाम अभ्यासणे.
३.प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कोरोनानंतर वर्गातील वर्तनावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

४.प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्याकरिता उपाययोजना सुचविणे.

संशोधनाची गृहितके :

१. कोरोनानंतर प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना शैक्षणिक अभ्यासक्रम अध्ययनात अडचणी येतात.

संशोधनाची कार्यवाही :

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर कोरोनंतर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधन समस्या ही वर्तमानकालीन असल्याने संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पध्दतीमधील सर्वेक्षण संशोधन पध्दतीची निवड केली आहे.

नमुना निवड:

उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद तालुक्यातील ग्रामीण भागातील २० जि. प. शाळामधुन १०० विद्यार्थ्यांची असंभाव्यता नमुना निवड पध्दती अंतर्गत सहेतुक नमुना निवड पध्दतीने नमुना म्हणुन निवड करण्यात आली.

संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने माहिती संकलित करण्यासाठी संशोधक निर्मित प्रश्नावली या साधनाचा वापर केलेला आहे. सदरील प्रश्नावली तज्ञ मार्गदर्शकाकडून प्रमाणित करुन घेतली. उस्मानाबाद जिल्हयातील उस्मानाबाद तालुक्यातील प्राथमिक जि.पत्र शाळातील १०० विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरुन घेतली.

संशोधनाची तंत्रे :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने माहिती संकलनासाठी प्रश्नावली हे साधन वापरले आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी संशोधकाने शेकडेवारी या सांखिकीय तंत्राचा वापर करुन निष्कर्ष व शिफारशी मांडल्या आहेत.

संशोधनाचे निष्कर्ष :

१. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची वायोगटानुसार आवश्यक शैक्षणिक प्रगती झाली नाही.
२. कोरोना महामारीच्या कालावधीमध्ये सहशालेय उपक्रमांची अमंलबजावणी करता आली नाही. यामुळे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास झाला नाही.
३. सर्वच प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांकडे माहिती तंत्रज्ञानाची साधने उपल्बध नसल्याने विद्यार्थ्यांची कुंचबना झाली.
४. अभ्यासक्रमातील विविध घटकांचे आकलन न झाल्यामुळे पुढील इयत्तेमधील पूर्वज्ञानावर अधारित विविध घटकांचे अध्ययन करताना विद्यर्थ्यांना अडचणी निर्माण होत आहेत.
५. कोरोना काळामध्ये या विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाईन शिक्षण पोहचले नसल्याने लेखनाची सवय मोडली आहे.
६. ८० टक्के विद्यार्थ्यांची वर्गामध्ये पूर्णवेळ बसण्याची सवय मोडली आहे.
७. कोरोना काळामध्ये विद्यार्थी शालेय प्रवाहापासून दुर गेल्यामुळे अंकगणिताची आकडेमोड भौमितीक आकृत्याचा विसर पडला आहे.
८. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या विविध संकल्पना, संज्ञा स्पष्ट न झाल्यामुळे, त्यांना अध्ययन करताना समस्या येत आहेत.

शिफारशी :

१. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना शिक्षकांनी प्रत्येक इयत्तावार अभ्यासक्रमातील पूर्व घटकांचे ज्ञान देणे आवश्यक आहे.
२. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मागील इयत्तमधील घटकांचे आकलन झाले नाही. अशा घटकांचे शिक्षकांनी अध्यापन करावे.
३. शिक्षकांनी अध्ययन अध्यापनात विविध शैक्षणिक साधनांचा वापर करावा.
४. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधावा म्हणून शिक्षकांनी विविध शालेय उपक्रमांची अमंलबजावणी करावी.
५. जि.प. प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना शैक्षणिक टॅब उपल्बध करुन द्यावे.
६. प्राथमिक स्तरावरील शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या लेखनाचा सराव करून घ्यावा.

७. शिक्षकांनी अंकगणिताची आकडेमोड, भौमितीक आकृत्याची माहिती यांचा सराव घ्यावा.
८. प्राथमक स्तरावरील विद्यार्थी वर्गात पूर्णवेळ बसतील यासाठी शिक्षकांनी विविधि अध्यापन पध्दती व साधनाचा वापर करावा.

समारोप:

कोरोना महामारीमुळे जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम झाला आहे का, हे प्रस्तुत संशोधनातून शोधण्यासाठी हे संशोधन संशोधकाने केले आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आवश्यक ऑनलाईन शिक्षणाच्या सुविधा उपल्बध नसल्याने कोरोना काळामध्ये शिक्षणापासून ते वंचित राहीले आहेत. हे प्रस्तुत संशोधनामधून दिसुन आले आहे. त्यामुळे जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यर्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध उपाययोजना शिक्षक व पालकांनी राबविणे गरजेचे आहे. ज्यामुळे या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

संदर्भग्रंथसूची:

१. घोरमोडे, के.यु. (२००८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, घोरमोडे कला नागपूर: विद्य प्रकाशन.
२. भिंताडे, वि.रा. (२००८) शैक्षणिक संशोधन पध्दती, नागपूर: पिंपळापूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स.
३. पंडित,बन्सी बिहारी (२००५) शिक्षणातील संशोधन, पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
४. पदरेशी, प्रकाश (२०१९) समुपदेशनाने शाळाबाहय मुली आणल्या शिक्षणप्रवाहात, जीवन शिक्षण, एस.सी.आर.टी.